जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक १६४ | सोमवार, ५ जानेवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER

## पुणे महापालिका निवडणुकीत १४ प्रभागांमध्ये अटीतटीची लढत

### बंडखोरी व पक्षांतरामुळे अनेक प्रभागात रंगणार थरारक सामना

**पुणे, ता. ४ :** पुणे महापालिकेच्या निवडणुकीत अर्ज माघारीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले आहे. यंदाच्या निवडणुकीत अनेक प्रभागांमध्ये चौरंगी आणि पंचरंगी लढती पाहायला मिळत असून काही ठिकाणी माजी नगरसेवक एकमेकांसमोर उभे ठाकले आहेत. तर काही प्रभागांमध्ये पक्षातून बंडखोरी करून दुसऱ्या पक्षात गेलेल्या उमेदवारांनी थेट आव्हान उभे केल्याने राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. त्यामुळे यावेळी किमान १४ जागांवर तुल्यबळ उमेदवारांमधील अटीतटीचा सामना अनुभवता येणार आहे.

पुणे महापालिकेच्या ४१ प्रभागांतील १६५ जागांसाठी एकूण १ हजार १६५ उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले आहेत. यंदाच्या निवडणुकीत बंडखोरीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. त्याचबरोबर युती आणि महाविकास आघाडीमध्ये



जागावाटप फिसकटल्याने एबी फॉर्मच्या वाटपावरून गोंधळ निर्माण झाला आहे. अनेक प्रभागांमध्ये युती आणि आघाडीतील मित्रपक्षांचे उमेदवार एकमेकांच्या विरोधात उभे राहिल्याने नाइलाजास्तव या लढतींना मैत्रीपूर्ण लढतीचे स्वरूप देण्यात आले आहे.

निवडणुकीच्या रिंगणात काही ठिकाणी पारंपारिक प्रतिस्पर्धी पुन्हा एकदा आमनेसामने आले आहेत. कसबा पेठ भागात भाजपचे गणेश बिडकर आणि माजी आमदार रवींद्र धंगेकर यांच्यातील संघर्ष पुन्हा चर्चेत आला आहे. २०१७ च्या निवडणुकीत दोघेही एकमेकांच्या विरोधात उभे होते आणि त्यावेळी बिडकर यांचा पराभव झाला होता. यंदा मात्र गणेश बिडकर यांच्यासमोर धंगेकर यांचे चिरंजीव प्रणव धंगेकर उभे असल्याने ही लढत अधिक लक्षवेधी ठरली आहे.

भाजपमधून बंडखोरी करून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेलेले अमोल बालवडकर यांनी भाजपचे लहू बालवडकर यांच्याविरोधात दंड थोपटले आहेत. तसेच माजी स्थायी समिती अध्यक्ष बाबूराव चांदेरे यांच्या समोर भाजपचे गणेश कळमकर उभे असून ही लढतही चुरशीची ठरण्याची शक्यता आहे.

शिवाजीनगर भागात भाजपच्या रेश्मा भोसले आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे दत्ता बहिरट यांच्यात पुन्हा एकदा थेट लढत होत आहे. २०१७ च्या निवडणुकीत रेश्मा भोसले यांनी दत्ता बहिरट यांचा पराभव केला होता. यंदा बहिरट या पराभवाची परतफेड करणार का, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. याच भागात स्थायी समितीचे माजी अध्यक्ष बाळासाहेब बोडके यांच्या विरोधात भाजपच्या डॉ. निवेदिता एकबोटे निवडणूक लढवत आहेत. सहकारनगर भागात सहा वेळा नगरसेवक म्हणून निवडून आलेले आबा बागूल यांच्या विरोधात भाजपचे महेश वाबळे यांचे आव्हान आहे. याच प्रभागात राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नगरसेवक सुभाष जगताप यांच्याविरोधात भाजपच्या वीणा गणेश घोष उभ्या असल्याने येथेही दुहेरी लढत रंगणार आहे.

पुण्यातील सर्वात मोठ्या प्रभाग क्रमांक ३८ मध्ये राष्ट्रवादीचे दत्तात्रेय धनकवडे आणि भाजपचे संदीप बेलदरे यांच्यात थेट लढत होत आहे. याच प्रभागात राष्ट्रवादीचे प्रकाश कदम, ठाकरे गटाचे वसंत मोरे, शिवसेनेचे स्वराज बाबर आणि भाजपचे व्यंकोजी खोपडे यांच्यात बहुरंगी लढत पाहायला मिळणार आहे. कोंढवा बुद्रूक आणि येवलेवाडी भागात भाजपच्या रंजना टिळेकर आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे गंगाधर बधे यांच्यात तुल्यबळ सामना रंगणार आहे. तसेच वानवडी-साळुंखेविहार भागात काँग्रेसचे प्रशांत जगताप आणि भाजपचे अभिजित शिवरकर यांच्यातील लढतीकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे. या पार्श्वभूमीवर पुणे महापालिकेची निवडणूक अत्यंत चुरशीची ठरणार असून मतदार कोणाच्या पारड्यात कौल देतात, यावरच अनेक दिग्गजांचे राजकीय भवितव्य ठरणार आहे.

#### आंदेकर कुटुंबीयातील सदस्य या प्रभागातून लढणार

नातू आयुष कोमकर हत्या प्रकरणात कुख्यात गुंड बंडू आंदेकरची सून सोनाली आणि भावजय लक्ष्मी ह्या कारागृहात आहेत. सोनाली आणि लक्ष्मी यांना राष्ट्रवादीकडून उमेदवारी दिली आहे. या दोघी प्रभाग क्रमांक २३ मधून निवडणूक रिंगणात आहेत. त्यांच्याविरोधात भाजपने अनुराधा मंचे, ऋतुजा गडाळे यांना उमेदवारी दिली आहे. याच उमेदवारीवरून भाजपने राष्ट्रवादीला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला आहे.

## संक्षिप्त

### टिळेकरवाडीत सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

**उरुळी कांचन, ता. ४ :** टिळेकरवाडी (ता. हवेली) येथे ग्रामपंचायत टिळेकरवाडी व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा यांच्या वतीने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी गावचे सरपंच गोवर्धन टिळेकर, उपसरपंच वैशाली चौरे, माजी सरपंच सुभाष लोणकर, गणेश टिळेकर, पोलीस पाटील विजय टिळेकर, अश्विनी टिळेकर, उज्वला टिळेकर, मुख्याध्यापिका सुवर्णा वडावराव, अंगणवाडी सेविका अलका भालेराव, मदतनीस अर्चना भालेराव, ग्रामपंचायत कर्मचारी आणि सर्व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्य, स्त्रीशिक्षणासाठी केलेल्या कार्याची माहिती दिली. तसेच विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांवर आधारित प्रबोधनात्मक चर्चा केली. ग्रामपंचायत प्रशासनाने या कार्यक्रमात सहभागी झालेल्या सर्व मान्यवरांचे आभार मानले.

### जीवरक्षक इंजेक्शनची बेकायदेशीर विक्री; तरुणावर गुन्हा

**पिंपरी, ता. ४ :** ब्लड प्रेशर कमी झाल्यावर डॉक्टरांच्या सल्ल्याने वापरले जाणारे इंजेक्शन खेळाडूंनी चुकीच्या पद्धतीने वापरल्यास जीवघेणे ठरू शकते, अशा इंजेक्शनची अवैध विक्री करणाऱ्यावर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

ही कारवाई थेरगाव फाटा येथे करण्यात आली. पोलीस शिपाई अमर राणे यांनी या प्रकरणी वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी २४ वर्षीय तरुणाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी हा मेफेन्टरम इन सल्फेट या इंजेक्शनची विनापरवाना विक्री करत असताना मिळून आला.

हे औषध कमी रक्तदाबासाठी वापरले जाते, परंतु शारीरिक कार्यक्षमता वाढवण्यासाठी त्याचा दुरुपयोग केला जातो, ज्यामुळे हृदयविकार किंवा मृत्यूचा धोका संभवतो. पोलिसांनी त्याच्याकडून ६७ हजार ४५२ रुपये किमतीचा इंजेक्शनचा साठा जप्त केला आहे. वाकड पोलीस तपास करत आहेत.

## शिरूर तालुक्यात गुटख्याचा खुलेआम धंदा; गुटखा माफियांवर मोक्का कारवाई होणार का?

**न्हावरे, ता. ४ :** राज्यात गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांवर कायद्याने बंदी असतानाही शिरूर तालुक्यात सर्रासपणे गुटखा विक्री सुरू असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. शिरूर, न्हावरे, शिक्रापूर तसेच मांडवगण फराटा या परिसरांमध्ये खुलेआम गुटखा विक्री होत असून यामागे गुटखा माफियांवर नेमका कोणाचा वरदहस्त आहे,असा गंभीर प्रश्न उपस्थित केला जात आहे.

तालुक्यातील अनेक पानठेले, दुकाने व टपऱ्यांवर बंदी असलेले गुटखा व तंबाखू मिश्रित पदार्थ सहज उपलब्ध होत असल्याने तरुण पिढी मोठ्या प्रमाणावर या व्यसनाच्या विळख्यात अडकत आहे. विशेष म्हणजे, वारंवार तक्रारी होऊनही पोलिस व अन्न व औषध प्रशासनाकडून ठोस व प्रभावी कारवाई होत नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.



त्यामुळे गुटखा बंदी केवळ कागदावरच असल्याचे वास्तव समोर येत आहे. बंदी असलेला गुटखा सापडल्यास संबंधित अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा राज्याचे मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिला आहे. मात्र, ही घोषणा प्रत्यक्षात कितपत कठोरपणे अंमलात येणार, हा प्रश्न जनतेतून उपस्थित होत आहे. याबाबत सामाजिक कार्यकर्ते (व्हिसल ब्लोअर) निलेश वाळुंज यांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करताना म्हटले आहे की, पोलिस विभाग व अन्न व औषध प्रशासनाने संयुक्तपणे विशेष मोहिम राबवून गुटखा विक्रीवर आळा घालावा. तसेच ज्या अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रात गुटखा व अन्य प्रतिबंधित पदार्थ आढळतील, त्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर केवळ निलंबन नव्हे तर थेट बडतर्फीची कारवाई करावी. यासोबतच त्यांच्या संपत्तीची सखोल चौकशी करावी, अशीही मागणी त्यांनी केली आहे. गुटखा माफियांविरोधात कठोर कायदे, आवश्यक असल्यास मोक्का सारखी कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत असून आता प्रशासन आणि पोलिस यंत्रणा यावर नेमकी काय भूमिका घेणार, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.


> अन्न व औषध प्रशासन विभागाकडून गुटखा माफियांवर कारवाई करण्याची मोहीम हाती घेतले असून मोठ्या प्रमाणावर गुटखा माफियांवर कारवाई केली जाईल.
> - **बी.एम. ठाकूर,** (सहाय्यक आयुक्त,अन्न व औषध प्रशासन विभाग पुणे)

> नागरिकांनी संबंधित गुटखा माफियांची नावे पोलिस प्रशासनाला कळवल्यास अशा नागरिकांची नावे गोपनीय ठेवून गुटखा माफियांवर कडक कारवाई केली जाईल.
> - **संदेश केंजळे,** (पोलिस निरीक्षक,शिरूर)

## खडकी येथील आनंद हॉटेलवर सुरू असलेल्या वेश्याव्यवसायाचा पर्दाफाश; सहा महिलांची सुटका

**दौंड, ता. ४ :** दौंड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खडकी (ता. दौंड) येथील आनंद हॉटेल, लॉजिंग ॲन्ड बारमध्ये दौंड पोलिसांनी छापा टाकून वेश्या व्यवसाय सुरु असल्याचे उघड केले आहे. या कारवाईत एकूण सहा महिलांची पोलिसांनी सुटका केली. तर एका आरोपीस अटक करण्यात आली असून दुसरा आरोपी फरार झाला आहे. या कारवाईत लॉजमधील आठ खोल्यात तपासादरम्यान पाच कंडोम पाकिटे, ग्राहक नोंदवही व आरोपीकडून एक हजार रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आली.

विश्वनाथ राजू शेट्टी (वय ४१, सध्या रा. आनंद लॉज, खडकी, ता. दौंड जि.पुणे, मुळ रा.तल्लोर ता. कंदापुर जि. उडपी राज्य कर्नाटक) असे अटक करून गुन्हा दाखल करण्यात आलेल्या व्यक्तीचे नाव आहे. तर त्याचा साथीदार मनोज मोहीते (पूर्ण नाव व पत्ता माहिती



नाही) हा फरार झाला आहे. या प्रकरणी दोघांवर अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा १९५६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी दौंड पोलीस ठाण्यातील पोलीस हवालदार संजय कोठावळे यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दौंड पोलीस ठाण्याच्या हद्दीत दौंड पोलीस व अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष पुणे ग्रामीण यांनी बुधवारी (ता. ०३) लॉज तपासणी मोहीम राबविण्यात आली. सायंकाळी साडेसात वाजता दोन पंचासमक्ष संयुक्त पथकाने खडकी येथील आनंद लॉजवर छापा टाकला. यावेळी हॉटेलचे काउंटर समोर खुर्चीवर दोन इसम बसलेले दिसले. पोलिसांची चाहूल लागताच तेथुन पळु लागले त्यावेळी एकाला पोलिसांनी ताब्यात घेतले. एकजण पळून गेला.

त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने त्याचे व पळून गेलेल्याचे नाव वरीलप्रमाणे सांगितले. लॉजींग मध्ये जावुन पाहणी केली असता आठ खोल्या दिसून आल्या. तेथील रूमची पाहणी केली असता त्यामध्ये एकुन ६ मुली व कँडोमचे पाकीट मिळुन आले. सदर मुलींची चौकशी केली असता सदरच्या मुली या पश्चिम बंगाल येथील ३, मुब्रा, धारावी, कर्नाटक, येथील प्रत्येकी एक असल्याचे सांगितले.

विश्वनाथ शेट्टी याचीव पंचा समक्ष तपासणी केली असता रोख एक हजार रुपये मिळून आले. त्यास हॉटेलचे मालकाबाबत विचारपुस केली असता त्याने सदरचे हॉटेल हे झुंबर जयवंत काळभोर रा. गुन्हवरेवस्ती, खडकी ता. दौंड यांचे असुन ते त्यांनी त्यांचेकडुन चालविण्यासाठी घेतले आहे. असे सांगितले. त्यावेळी काउंटर ची पाहणी केली असता तेथे येणाऱ्या ग्राहकांच्या नोंदीचे रजिस्टर मिळुन आले. पंचनामा करून सर्व मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला.

दरम्यान, पोलिस चौकशीत ताब्यात घेतलेल्या महिलांनी आपण लॉजमध्ये वेश्याव्यवसाय करत असल्याची कबुली दिली. प्रत्येक ग्राहकाकडून एक हजार रुपये घेतले जात असून त्यातील पाचशे रुपये महिलांना दिले जातात, तर उर्वरित रक्कम आरोपी विश्वनाथ शेट्टी व मनोज मोहीते ठेवून घेत असल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणी दौंड पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर ०४/२०२६ अन्वये अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा १९५६ चे कलम ३, ४ व ५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## मुंबईचा महापौर महायुती, हिंदू आणि मराठीच होणार; फडणवीसांची घोषणा

**मुंबई, ता. ४ :** मुंबई महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. काल मुंबई येथील वरळीतील भाजप आणि शिवसेनेच्या वतीने आयोजित मेळाव्यातून महायुतीच्या प्रचाराचा पहिला नारळ फुटला. मुंबईचा महापौर कोण होणार याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंचावरून थेट घोषणा करत मुंबईचा महापौर महायुती, हिंदू आणि मराठीच होणार असल्याचे मोठं विधान केले.

तसेच यावेळी बोलताना फडणवीसांनी ठाकरे बंधूंवर निशाणा साधत उबाठाचे खासदार संजय राऊत यांच्यावर देखील टीका केली. मुंबई महापालिकेत श्रेय चोरणारी टोळी सक्रिय झाली आहे, अशा शब्दांत फडणवीसांनी ठाकरे बंधूंवर झोंबणारी टीका केली. ही निवडणूक मुंबईकरांसाठी महत्वाची आहे देखील फडणवीस म्हणाले.



नुकतेच मुंबईत ठाकरे बंधूंची पुढची पिढी आमदार आदित्य ठाकरे आणि मनसेचे अमित ठाकरे यांनी त्यांची सत्ता मुंबईत आल्यावर काय काय बदल होतील याचे व्हीजन सादर केले. यावर फडणवीसांनी समाचार घेत मोठं घर त्याला देऊ आणि स्वप्न पूर्ण करु असेही ते म्हणाले. मुंबईतील झोपडपट्टी परिसरातील लोकांना घर देऊ. महायुतीच्या सरकारने एसआरएच्या माध्यमातून घरं दिल्या, योजना आपल्या अजूनही सुरु आहेत. घरांचा प्रश्न आम्ही सोडवत आहोत, असे फडणीस म्हणाले. पत्राचाळीचा तुम्ही घोटाळा केला. तिथल्या लोकांना बेघर केलं, असा आरोपही फडणवीसांनी ठाकरे गटावर केला आहे. त्यामुळे आता मुंबई महापालिका निवडणुकीत राजकारण चांगलेच तापले आहे.

#### राऊतांना खोचक टोला

मुंबईचा महापौर महायुती, हिंदू आणि मराठीच होणार, पण परवा वारीस पठाण बोलून गेले बुरखेवाली मेयर बनेगी, मात्र सकाळचा भोंगा त्यावर बोलेना असा खोचक टोला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उबाठाचे नेते खासदार संजय राऊत यांना लगावला.

## यवत येथील कचऱ्याचा प्रश्न गंभीर; घंटागाडीच्या वेळापत्रकाअभावी नागरिक त्रस्त

**राहुलकुमार अवचट**

यवत, ता. ०४ : राज्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान राबविले जात असताना यवत ग्रामपंचायत हद्दीत मात्र कचऱ्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. गावात कचरा संकलनासाठी वापरण्यात येणाऱ्या घंटागाडीचे कोणतेही ठोस वेळापत्रक नसल्याने कचरा व्यवस्थापन पूर्णपणे कोलमडले असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

यवत ग्रामपंचायतीकडून दररोज कचरा संकलन होत नसून कधी दोन तर कधी तीन दिवसांनी घंटागाडी येत असल्याचे चित्र आहे. परिणामी गावाच्या विविध भागांत कचऱ्याचे ढीग साचले असून



परिसरात दुर्गंधी पसरली आहे. यवत हे पुणेसोलापूर महामार्गावरील मोठे गाव असून, नियमित कचरा उचल होत नसल्याने रस्त्यांच्या कडेला कचऱ्याचे साम्राज्य निर्माण झाले आहे.

यवत ग्रामपंचायतीचा कचरा प्रक्रिया प्रकल्प गेल्या अनेक वर्षांपासून कागदावरच असल्याचे वास्तव आहे. प्रकल्पाला गती न मिळाल्याने कचरा उचलण्याचे नियोजनही विस्कळीत झाले आहे. सध्या गावातील कचरा तलाठी कार्यालयाशेजारी असलेल्या खाणीत टाकण्यात येत असून ही खाण पूर्णपणे भरली आहे. त्यामुळे कचरा आजूबाजूच्या रस्त्यावर व परिसरात पसरत असून प्रदूषणाचा धोका वाढला आहे. मागील अनेक वर्षांपासून कचरा डेपोतील कचऱ्यावर कोणतीही प्रक्रिया केली जात नसल्याने आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी ग्राम पंचायतीकडे सक्षम यंत्रणा नसल्याचे स्पष्ट होत आहे. गावातील अनेक भागांत घंटागाडी पोहोचत नाही, तसेच कचराकुंड्यांचीही व्यवस्था नाही. त्यामुळे कचरा टाकायचा तरी कुठे, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. प्रत्येक घरापर्यंत घंटागाडी वेळेवर पोहोचावी, आवश्यक ठिकाणी कचराकुंड्या बसवाव्यात, तसेच सुविधा उपलब्ध करूनही कचरा उघड्यावर टाकणाऱ्यांवर सीसीटीव्हीच्या साहाय्याने दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

#### घंटागाडीचे वेळापत्रकच नाही

गेल्या अनेक वर्षांपासून घंटागाडीच्या माध्यमातून कचरा संकलन केले जात असले तरी आजतागायत निश्चित वेळापत्रक जाहीर करण्यात आलेले नाही. घंटागाडी कधी सकाळी तर कधी संध्याकाळी, तर कधी दोनतीन दिवसांनी येते. त्यामुळे नोकरदार नागरिकांना गाडीची वाट पाहावी लागते. मात्र गाडी येण्याची खात्री नसल्याने अनेक नागरिक कचरा रस्त्यावर किंवा मोकळ्या जागी टाकताना दिसत आहेत.

> घंटागाडीचे वेळापत्रक नसल्याची बाब मान्य असून लवकरच निश्चित वेळापत्रक जाहीर केले जाईल. कचरा संकलनासाठी योग्य त्या उपाययोजना करण्यात येतील.
> - **समीर दोरगे,** सरपंच, यवत, ता. दौंड

> कचऱ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी ग्रामपंचायत प्रयत्नशील असून घंटागाडीचे योग्य नियोजन व वेळापत्रक लवकरच तयार केले जाईल.
> - **बालाजी सरवदे,** ग्रामपंचायत अधिकारी, यवत, ता. दौंड

## संक्षिप्त

### देशात ५ राज्यांमध्ये होणार विधानसभा निवडणूक

**मुंबई, ता. ४ :** पुढील काही महिन्यात देशात ५ राज्यात विधानसभा निवडणुका पार पडणार आहेत. आसाम, पश्चिम बंगाल, पुद्दुचेरी, तामिळनाडू आणि केरळ या ५ राज्यात यंदा विधानसभा निवडणुकीचा धुरळा उडणार आहे. मार्च-एप्रिलमध्ये पश्चिम बंगालच्या विधानसभा निवडणुका लागण्याची शक्यता आहे. पश्चिम बंगालमध्ये सध्या ममता बॅनर्जी यांचं सरकार आहे. मार्च-एप्रिल महिन्यात आसामच्या निवडणुका होऊ शकतात. येथे सध्या हिमंता बिस्वा सरमा यांच्या नेतृत्वाखाली भाजपचे सरकार आहे. तामिळनाडूमध्ये सध्या एम.के स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखाली द्रविड मुन्नेत्र कळघम यांचं सरकार आहे. केरळमध्ये पिनारायी विजयन यांच्या डाव्या लोकशाही आघाडीचे सरकार असून येथे सत्ता मिळवण्यासाठी भाजपकडूनही प्रयत्न केले जात आहे. तर ऑल इंडिया एनआर काँग्रेस आणि भाजप यांचं सरकार सध्या पुद्दुचेरीमध्ये आहे. येथे काँग्रेसकडून सत्ता मिळवण्यासाठी जोरदार तयारी केले जात आहे.

### महापालिकेत सत्ता द्या, पुणे आणि पिंपरी चिंचवड बारामतीसारखं करतो : अजित पवार

**पुणे, ता. ०४ :** वाहतूक कोंडीत जगामध्ये चौथा क्रमांक, खड्ड्यांचे रस्ते, कचऱ्याचे साम्राज्य, हवा आणि पाण्याचे प्रदूषणाचे शहर अशी पुण्याची ओळख मागील ९ वर्षे महापालिकेतील सत्ताधारी त्रिकुटाने केली. ही ओळख बदलण्यासाठी कारभारी बदला. माझ्या हातात सत्ता द्या, पुणे शहर आणि पिंपरी चिंचवड बारामतीसारखे करून दाखवतो, असे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले. यावेळी अजित पवार यांनी गुन्हेगारांना उमेदवारी देण्यावरून होत असलेल्या टीकेवरही उत्तर दिले. एखाद्याच्या पतीने गुन्हा केला म्हणून त्याची पत्नी व कुटुंबीयांना गुन्हेगार ठरविणे योग्य नसल्याचे सांगत टीकाकरांना प्रत्युत्तर दिले.

### दीडशे अपक्षांना चिन्ह वाटप; काहींना मिळाली बॅट तर काहींच्या हाती कपबशी

**पिंपरी, ता. ०४ :** पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवारी अर्ज माघारीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निवडणूक रिंगणातील चित्र स्पष्ट होत असून, अपक्ष उमेदवारांना निवडणूक चिन्हांचे वाटप करण्यात आले आहे. यामध्ये तब्बल १४९ अपक्ष उमेदवारांना विविध चिन्हे देण्यात आली आहेत. कुणाच्या हाती क्रिकेटची बॅट तर कुणाच्या हाती कपबशी, कुणाला शिडी, छत्री, पतंग, टॉर्च, गाडी अशी विविध चिन्हे मिळाली असून, या चिन्हांच्या आधारे मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी अपक्ष उमेदवार सज्ज झाले आहेत. राजकीय पक्षांच्या अधिकृत उमेदवारांसोबतच मोठ्या संख्येने अपक्ष उमेदवार निवडणूक रिंगणात असल्याने अनेक प्रभागांमध्ये हायव्होल्टेज लढती होण्याची चिन्हे आहेत.

### श्रेय चोरणारी टोळी मुंबईत सक्रीय : फडणविसांचा टोला

**मुंबई, ता. ०४ :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत सभा घेऊन भाजपा-महायुतीने प्रचाराचा नारळ फोडला. यावेळी आपल्या भाषणात त्यांनी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरेंवर जोरदार टीकाही केली.मला तर लक्षात आलं की श्रेय चोरणारी टोळी मुंबईत सक्रीय आहे. काही अबोध बालकं आहेत ती म्हणतात सगळं आम्हीच केलं. अर्ध्या रात्रीत मुंबईकरांना विचारलं तरीही मुंबईकर सांगतील हे महायुतीने केलं. विकासाच्या प्रत्येकात खोडा कुणी घातला हे मुंबईकरांना विचारलं तर ते एकच नाव घेतील ते म्हणजे माननीय उद्धव ठाकरे. निवडणूक आली की काही लोकांना मुंबई उत्तरेकडे सरकताना दिसते. मुंबई कुठेही सरकत नसते, तुमची बुद्धी सरकते आहे, असा टोला फडणवीसांनी ठाकरे बंधूंना लगावला. तसेच त्यांनी मुंबईमध्ये महायुतीचा महापौर बसवायचा असल्याचे सांगितले.

### राहुल गांधी हे पार्ट टाइम नेते; भाजप नेत्याची टीका

**नवी दिल्ली, ता. ०४ :** भाजपाचे नेते शहजाद पूनावाला यांनी काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या परदेश दौऱ्यावरून त्यांच्यावर निशाणा साधला आहे. राहुल गांधी आता लीडर ऑफ पर्यटन झाले आहेत असा टोला पूनावाला यांनी लगावला. शहजाद पूनावाला म्हणाले की, राहुल गांधी कधीही वर्क मोडमध्ये नसतात, त्यांना फक्त सुट्यांमध्ये राहायला आवडतं. आता तर ते कायमस्वरूपी सुटीच्या मूडमध्ये दिसतात.पुढे ते म्हणाले, नरेंद्र मोदी गुजरातचे मुख्यमंत्री झाल्यापासून ते देशाचे पंतप्रधान होईपर्यंत सतत वर्क मोडमध्ये आहेत. जेव्हा बिहार निवडणुका सुरू होत्या, तेव्हा राहुल गांधी जंगल सफारीचा आनंद लुटत होते. यावरून एक गोष्ट स्पष्ट होतं की, राहुल गांधी हे पार्ट टाइम नेते आहेत. तसेच ते आपल्या परदेश दौऱ्यात कोणाकोणाला भेटतात हे देशाला सांगायला हवं, असेही पूनावाला म्हणाले.

### हवामान बदलामुळे थंडीची लाट ओसरली

पुणे, ता. ०४ : हवामान बदलामुळे शहरासह जिल्ह्यातील थंडीची लाट ओसरली आहे. गेल्या तासांत किमान तापमानात लक्षणीय वाढ झाल्यामुळे पारा १२ अंशाच्या पुढे गेला. परिणामी थंडीचा जोर कमी झाला असून, ऊन आणि ढगाळ वातावरणाचा लपंडाव पाहायला मिळत आहे. नवीन वर्षात थंडीचा जोर वाढेल, असा अंदाज हवामान विभागाकडून वर्तविण्यात आला होता. मात्र हवामानातील बदलामुळे मागील तीन ते चार दिवसांत किमान तापमनात लक्षणीय घट झाली आहे. त्यात दोन दिवसांपासून ढगाळ वातावरणामुळे कमाल तापमानात घट झाली आहे. त्यामुळे उन्हाचा चटका कमी झाला आहे.

# स्वामिनी संकल्पनेतून संस्कार, शिस्त व यशाचा महोत्सव

## स्वामी विवेकानंद विद्यालय व बालवाडीचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**उरुळी कांचन, ता. ४ :** स्वामी विवेकानंद प्रतिष्ठान संचलित स्वामी विवेकानंद विद्यालय (माध्यमिक विभाग) व बालवाडी यांचे वार्षिक स्नेहसंमेलन अत्यंत उत्साहपूर्ण, शिस्तबद्ध व सांस्कृतिक वैभवाने परिपूर्ण वातावरणात स्वामिनी या प्रेरणादायी संकल्पनेवर मोठ्या दिमाखात नुकतेच पार पडले.



स्वामिनी ही संकल्पना स्वावलंबन, आत्मबळ, नेतृत्वगुण, नैतिक मूल्ये व सामाजिक जबाबदारी यांचे प्रतीक असून विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्य, नाट्य व गीतांमधून कर्तव्यनिष्ठा, धैर्य, शिस्त, सेवा, देशप्रेम व संस्कार यांचे प्रभावी दर्शन घडले. बालवाडीतील चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या उत्स्फुर्त व मनोरंजक सादरीकरणांनी उपस्थितांची मने जिंकली. प्रत्येक सादरीकरणातून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, सृजनशीलता व संघभावना ठळकपणे दिसून आली.

या स्नेहसंमेलनास प्रमुख पाहुणे व कार्यक्रमाध्यक्ष प्रदीप कुंभार, संस्थाध्यक्ष सुरेश कांचन, उपाध्यक्ष सुरेश सातव, सचिव पंडित कांचन, खजिनदार प्रकाश कांचन यांच्यासह विश्वस्त रवींद्र बडेकर, संभाजी कांचन, कमलाकर अहिनवे, इंद्रभान धुमाळ, अक्षय कांचन व साहेबराव कांचन यांची प्रमुख उपस्थिती लाभली. शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर म्हणून उन्नती कन्या विद्यालयाच्या संचालिका डॉ. नुपूर कांचन, स्वामी विवेकानंद अकॅडमीचे प्राचार्य सुमित दास तसेच स्वामी विवेकानंद विद्यालय (प्राथमिक विभाग) यांच्या मुख्याध्यापिका सरिता राऊत यांनीही कार्यक्रमास उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. कार्यक्रमाध्यक्ष प्रदीप कुंभार यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात स्वामिनी संकल्पनेवर आधारित सांस्कृतिक सादरीकरणांचे विशेष कौतुक करत विद्यार्थ्यांनी दिलेल्या सामाजिक व नैतिक संदेशांचे अभिनंदन केले.

मुख्याध्यापिका उज्ज्वला साळुंके यांनी वार्षिक अहवाल सादर करताना शाळेने सलग ९ वर्षे इयत्ता दहावीचा १०० टक्के निकाल प्राप्त केल्याची माहिती दिली. शैक्षणिक नियोजन, नियमित मूल्यमापन, वैयक्तिक मार्गदर्शन, पालकशिक्षक समन्वय व शिक्षकवृंदाच्या अथक परिश्रमांमुळे हे यश साध्य झाल्याचे त्यांनी नमूद केले. बालवाडी व माध्यमिक विभागातील शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सांस्कृतिक व नैतिक विकासासाठी केलेल्या परिश्रमांचेही त्यांनी विशेष उल्लेख केला. यावेळी इंद्रभान धुमाळ यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे कौतुक करत स्नेहसंमेलनाचे अत्यंत प्रभावी व शिस्तबद्ध आयोजन केल्याबद्दल संस्थेचे अभिनंदन केले.

दरम्यान, संपूर्ण स्नेहसंमेलन आनंददायी व संस्मरणीय वातावरणात संपन्न झाले. हा कार्यक्रम शाळेच्या सर्वांगीण विकास, मूल्याधिष्ठित शिक्षण व शिस्तप्रिय संस्कारांची उज्ज्वल साक्ष देणारा ठरला असून स्वामी विवेकानंद विद्यालय (माध्यमिक विभाग) व बालवाडीच्या शैक्षणिक वाटचालीतील एक अभिमानास्पद टप्पा ठरला.

# पळसदेव येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

**संतोष पवार**

पळसदेव, ता. ४ : भारतीय स्त्री-मुक्ती आंदोलनाच्या महाराष्ट्रातील प्रथम अग्रणी, मुलींसाठी शिक्षणाची ज्ञानगंगा तळागाळापर्यंत पोहोचवणाऱ्या थोर समाजसेविका, आद्य भारतीय शिक्षिका व मुख्याध्यापिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती पळसदेव (ता. इंदापूर) येथील पळसनाथ प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून विद्यालयातील क्रीडाशिक्षिका सुवर्णा नायकवाडी उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी सावित्रीबाईंच्या जीवनकार्यावर आपले विचार व्यक्त केले.

जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाचे उद्धार करी या आशयातून स्त्रीशिक्षणाचा प्रसार करणाऱ्या सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीशिक्षणाचा भक्कम पाया रचला. तत्कालीन समाजातील अनिष्ट प्रथा व परंपरांना विरोध करत त्यांनी समाजप्रबोधनाचे महत्त्वपूर्ण कार्य केले. सावित्रीबाईंच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू उलगडत फुले दांपत्याचा प्रेरणादायी जीवनपट सुवर्णा नायकवाडी यांनी विद्यार्थ्यांसमोर प्रभावीपणे मांडला. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना बालिका दिनाच्या शुभेच्छा देताना विद्यालयाचे प्राचार्य विकास पाठक यांनी सावित्रीबाईंच्या विचार व आचारांचे आचरण करून विद्यार्थ्यांनी आपले जीवन घडवावे, असे प्रतिपादन केले.

दरम्यान, पळसनाथ पूर्व-प्राथमिक व प्राथमिक विद्यालयातही सावित्रीबाई फुले यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी बालचमुच्या विद्यार्थिनी सावित्रीबाईंच्या वेशभूषेत उपस्थित होत्या.

याप्रसंगीप्राथमिकविद्यालयाच्या प्राचार्या सिद्धमा पाटील, प्राचार्य विकास पाठक, पर्यवेक्षक संजय जाधव, संतोष पवार, सिकंदर देशमुख, नितीन जगदाळे, मुरलीधर गीते, नितीन दशवंत, अप्पासाहेब यमपुरे, गणेश लोंढे, ऋषिकेश मोरे, सुवर्णा नायकवाडी, उज्ज्वला वाघमारे, शुभांगी कोळी, प्रतिभा कांबळे, सुदर्शना पवार, सूरज काळे, पांडुरंग कुचेकर आदींसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोणावळ्याच्या लायन्स पॉइंट दरीत सापडला तरुणाचा मृतदेह

**लोणावळा, ता. ०४ :** लोणावळ्यातील लायन्स पॉईंट येथील खोल दरीमध्ये एका तरुणाचा मृतदेह आढळून आला आहे. परेश हटकर नावाचा हा ३८ वर्षीय तरुण बुधवारी सकाळपासून बेपत्ता होता. घरून कामावर जाण्यासाठी निघालेला हा तरुण रात्री उशिरापर्यंत घरी परतलाच नाही, तसेच त्याच्याशी कोणताही संपर्क होऊ शकला नव्हता. यानंतर शोध घेत असताना लोणावळ्यातील प्रसिद्ध पर्यटन स्थळावर त्याची गाडी बेवारस स्थितीत उभी असल्याचे पोलिसांना दिसून आली. स्थानिक पोलीस पाटील संतोष मरगळे यांनी याबद्दलची पूर्वसूचना दिल्यानंतर पोलिसांनी तपासचक्र फिरवले.



या प्रकरणातील तांत्रिक बाबी अत्यंत गुंतागुंतीच्या होत्या कारण परेश यांचा मोबाईल लायन्स पॉईंटवर सापडला होता, मात्र मोबाईलचे सिग्नल लोकेशन पाली परिसरात दिसत होते. हा तांत्रिक गोंधळ ओळखून ७०० फुट खोल दरीत शोध घेण्याचे ठरले. श्रुती शिंदे, योगेश उंबरे आणि सचिन गायकवाड या सदस्यांनी दोरीच्या मदतीने दरीत उतरून शोधमोहीम राबवली. जवळपास ४ तासांच्या प्रयत्नानंतर या पथकाने परेश यांचा मृतदेह शोधून काढला आणि तो सुरक्षितपणे वर आणून पोलिसांच्या स्वाधीन केला. परेश यांचा मृत्यू अपघाताने झाला की यामागे काही घातपात आहे, याचा तपास लोणावळा ग्रामीण पोलीस करत आहेत. घरून ऑफिसला जातो असे सांगून निघालेली व्यक्ती लोणावळ्यात कशी पोहोचली आणि कार रस्त्याच्या कडेला उभी करून ते दरीत पडले कसे, असे अनेक प्रश्न आता उपस्थित होत आहेत. पोलिसांनी या घटनेचा पंचनामा करून अधिक तपास सुरु आहे.

# दोन लाखांपर्यंतच्या पीक कर्जावरील मुद्रांक शुल्क माफ; राज्य सरकारचा निर्णय

**पुणे, ता. ०४ :** राज्य सरकारने शेतकऱ्यांना दिलासा देणारा महत्त्वपूर्ण निर्णय घेत शेतीच्या पीक कर्जावरील मुद्रांक शुल्क पूर्णतः माफ केले आहे. हा निर्णय १ जानेवारीपासून अंमलात आला असून दोन लाख रुपयांपर्यंतच्या पीक कर्जाला तो लागू राहणार आहे. पालिका निवडणुकांच्या ऐन धामधुमीत याबाबतचे राजपत्र राज्य सरकारने जारी झाले आहे.




या निर्णयानुसार शेती पीक कर्जासाठी आवश्यक असलेल्या करारपत्रे, हक्कविलेख, तारण, गहाणखत, हमीपत्र, प्रतिभूती बंधपत्र, घोषणापत्र तसेच संबंधित सर्व संलग्न कागदपत्रांवरील मुद्रांक शुल्क माफ करण्यात आले आहे.

यापूर्वी प्रत्येक एक लाख रुपयांच्या कर्जावर ०.३ टक्के दराने मुद्रांक शुल्क आकारले जात होते. त्यामुळे दोन लाख रुपयांच्या कर्जासाठी शेतकऱ्यांना सुमारे ६०० रुपये मुद्रांक शुल्क भरावे लागत होते. आता हे शुल्क रद्द झाल्याने शेतकऱ्यांच्या कर्जखर्चात थेट बचत होणार आहे. हा निर्णय राज्यभर लागू असून सर्व राष्ट्रीयीकृत बँका, सहकारी बँका व अन्य कर्जवाटप करणाऱ्या संस्थांना तो बंधनकारक राहणार आहे.

मुद्रांक शुल्क माफ झाल्यामुळे पीक कर्जाची प्रक्रिया अधिक सुलभ होणार असून शेतकऱ्यांवरील आर्थिक भार कमी होऊन प्रशासकीय प्रक्रियाही सोपी होणार असल्याचा दावा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला.


दरम्यान, शेती उत्पादन खर्च, बियाणे, खते, औषधे व मजुरीचे वाढते दर लक्षात घेता हा निर्णय शेतकऱ्यांसाठी दिलासादायक असल्याची प्रतिक्रिया शेतकरी संघटनांकडून व्यक्त करण्यात येत आहे. विशेषतः अल्पभूधारक व मध्यम शेतकऱ्यांना याचा मोठा लाभ होणार असून पीक कर्ज घेण्यास प्रोत्साहन मिळेल, असे मत व्यक्त करण्यात येत आहे.

# टाकवेतील सोएक्स कंपनीवर एफडीएची कारवाई ; ३१ कोटींचा साठा जप्त

**पुणे, ता. ४ :** मावळ तालुक्यातील टाकवे बुद्रूक परिसरात अन्न व औषध प्रशासनाने आतापर्यंतची एक मोठी धडक कारवाई केली आहे. या कारवाईत तब्बल ३१ कोटी ६७ लाख रुपयांचा बेकायदा तंबाखूजन्य साठा जप्त करण्यात आला असून, यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

सोएक्स इंडिया नावाच्या कंपनीवर टाकलेल्या छाप्यात तब्बल ५ लाख ४८ हजार किलो प्रतिबंधित फ्लेवर हुक्का आणि तंबाखूजन्य साहित्य सापडले. हा सगळा साठा कायद्याने बंदी असलेला आणि मानवी आरोग्यास घातक असल्याचं औषध प्रशासनाकडून सांगण्यात आलं आहे. या प्रकरणी पाच जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

औषध प्रशासनाच्या विशेष भरारी पथकाने गुरुवारी ही कारवाई केली.




३१ डिसेंबर रोजी ठाणे जिल्ह्यातील नार्कोली येथे दाखल झालेल्या एका गुन्ह्याचा तपास करत असताना या पथकाला टाकवे बुद्रूक येथील सोएक्स इंडिया कंपनीचा धागा लागला. त्यानंतर पथकाने थेट कंपनीवर छापा टाकला असता इतका मोठा बेकायदा साठा उघडकीस आला.

या प्रकरणात वडगाव पोलिसांनी कंपनीचा सहाय्यक व्यवस्थापक अनिल कुमार चौहान याला अटक केली असून, न्यायालयाने त्याला ८ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. याशिवाय कंपनीचे संचालक असिफ फाजलानी आणि फैजल फाजलानी यांच्यासह सोएक्स इंडिया (मुंबई) आणि सोएक्स इंडिया (टाकवे बुद्रूक) या दोन्ही कंपन्यांविरोधातही गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

ही कारवाई भंडाऱ्याचे सहाय्यक आयुक्त यदुराज दहातोंडे आणि सोलापूरचे अन्न सुरक्षा अधिकारी मंगेश लवटे यांच्या नेतृत्वाखालील विशेष पथकाने केली. अन्न सुरक्षा अधिकारी अस्मिता जयंत टोणपे यांनी या प्रकरणी वडगाव पोलीस ठाण्यात अधिकृत तक्रार दाखल केली आहे. मावळ परिसरात आजवर झालेली ही सर्वात मोठी औषध प्रशासनाची कारवाई मानली जात असून, बेकायदा तंबाखू व्यवसायावर मोठा आघात मानला जात आहे.

### राज्यात १५ हजार ९३१ उमेदवार निवडणुकीच्या मैदानात

**पुणे, ता. ४ :** राज्यातील २९ महापालिकांसाठी होणाऱ्या निवडणुकीत २ हजार ८६९ नगरसेवक निवडून दिले जाणार आहेत. त्यासाठी १५ हजार ९३१ उमेदवार रिंगणात आहेत. मुंबईमध्ये २२७ जागांसाठी १७०० उमेदवार रिंगणात आहेत. त्या पाठोपाठ १६५ जागांच्या निवडणुकीत ९६८ उमेदवारांनी माघार घेऊन देखील १ हजार १६६ उमेदवार रिंगणात आहेत. तर सर्वात कमी २३० उमेदवार इचलकरंजीमध्ये असून तेथे ६५ जागांसाठी मतदान होत आहे. इचलकरंजी आणि जालना महापालिकेत पहिल्यांदाच निवडणूक होत आहे. विशेष म्हणजे २९ महापालिकांसाठी एकूण ३३ हजार ४२७ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. त्यातील २४ हजार ७७१ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले. ८ हजार ८४० उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याची माहिती निवडणूक आयोगानं दिली आहे.

# सासरच्या छळाला कंटाळून महिलेची आत्महत्या

## सासू-सासऱ्यासह आजेसासूला अटक, पतीवर गुन्हा

**पुणे, ता. ४ :** हडपसर भागातील शेवाळवाडी येथे एका २२ वर्षांच्या विवाहितेने सासरच्या जाचाला कंटाळून जीवनयात्रा संपवल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. पूनम युवराज लष्करे असे या मृत तरुणीचे नाव आहे. या प्रकरणी फुरसुंगी पोलिसांनी कारवाई करत पूनमचे सासरे संतोष लष्करे, सासू तारा लष्करे आणि आजेसासू बायडाबाई यांना अटक केली असून पती युवराज लष्करे याच्यावरही गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पूनमचा विवाह काही काळापूर्वी युवराज या रिक्षाचालकाशी झाला होता. मात्र, लग्नानंतर काही दिवस उलटले तरी मूल होत नसल्याने सासरच्या मंडळींनी तिला मानसिक आणि शारीरिक त्रास द्यायला सुरुवात केली होती. सासरचे लोक तिला सतत टोचून बोलत असत. या छळासोबतच, पतीला नवीन रिक्षा विकत



घेण्यासाठी माहेरून पैसे घेऊन ये, अशी मागणीही करत होता. पैशांसाठी तिचा वारंवार छळ केला जात होता.

सासरच्या या सततच्या त्रासामुळे पूनम प्रचंड दबावाखाली होती. अखेर, तिने हतबल होऊन राहत्या घरात गळफास लावून आत्महत्या केली. या घटनेनंतर पूनमच्या वडिलांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. पोलिसांनी तात्काळ हालचाल करत ३ जणांना बेड्या ठोकल्या आहेत. पोलीस आता या प्रकरणाचा अधिक तपास करत असून फरार असलेल्या पतीचा शोध घेत आहेत.

# भोर येथील मयूर खुंटे हत्या प्रकरण ; पोलिस प्रशासनाच्या भूमिकेवर तीव्र संताप

## फरार पोलीस उपनिरीक्षक अनिल चव्हाण यांच्या अटकेसाठी घंटानाद आंदोलन

**भोर, ता. ४ :** मयूर खुंटे हत्या प्रकरणाला अनेक दिवस उलटूनही या गंभीर गुन्ह्यातील फरार आरोपी पोलीस उपनिरीक्षक अनिल चव्हाण यांना अद्याप अटक न झाल्याने भोर तालुक्यासह भोरराजगडहवेली परिसरात तीव्र असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर शनिवारी (ता. ०३) सकाळी अकरा वाजता भोर पोलीस स्टेशनसमोर समस्त आंबेडकरी चळवळीतील विविध पक्ष व संघटनांच्या वतीने घंटानाद आंदोलन करण्यात आले.




मयूर खुंटे यांच्या हत्येनंतर तपास प्रक्रियेबाबत सुरुवातीपासूनच अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. हत्या प्रकरणात उपनिरीक्षक अनिल चव्हाण यांचे नाव आरोपी म्हणून समोर येऊनही त्यांना अटक न होणे, ही बाब केवळ निष्काळजीपणाची नसून आरोपीला वाचवण्याचा प्रयत्न तर नाही ना, असा थेट सवाल आंदोलकांनी उपस्थित केला. सामान्य आरोपी असता तर आतापर्यंत अटक झाली असती; मात्र आरोपी पोलीस अधिकारी असल्याने कायदा वेगळा का? असा संतप्त सवाल यावेळी करण्यात आला.

या घंटानाद आंदोलनात विविध आंबेडकरी संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. हातात घंटा व फलक घेऊन आंदोलकांनी पोलिस प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. झोपेचे सोंग घेतलेल्या प्रशासनाला जागे करण्यासाठी हे आंदोलन आहे, अशी भूमिका आंदोलकांनी मांडली.

आंदोलनादरम्यान काही काळ रास्ता रोको केल्याने परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. यामुळे वाहतूक विस्कळीत झाली होती. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलिसांनी अतिरिक्त बंदोबस्त तैनात केला. मात्र, या आंदोलनासंदर्भात प्रतिक्रिया देण्यास पोलिस उपअधीक्षकांनी पत्रकारांशी बोलण्यास नकार दिला.

आंबेडकरी संघटनांच्या वतीने पोलिस प्रशासनाला निवेदन देण्यात आले असून त्यात अनिल चव्हाण यांना तात्काळ अटक करण्याची ठोस मागणी करण्यात आली आहे. तसेच, लवकरात लवकर कारवाई न झाल्यास आगामी काळात खेड शिवापूर येथे तीव्र स्वरूपाचे आंदोलन, मोठ्या प्रमाणावर रास्ता रोको व जनआंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशाराही देण्यात आला आहे.

दरम्यान, या प्रकरणामुळे संपूर्ण तालुक्यात पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. न्याय मिळेपर्यंत लढा थांबणार नाही, अशी ठाम भूमिका आंदोलकांनी घेतली असून पुढील काळात प्रशासन कोणती ठोस व पारदर्शक कारवाई करते, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

# सावत्र चुलत्याच्या कुटुंबाकडून दांपत्याला बेदम मारहाण; चार जणांवर गुन्हा दाखल

**लोणीकंद, ता. ४ :** कामगार महिलेकडून उसाचे वाडे विकत घेतल्याच्या कारणावरून सावत्र चुलत्याच्या कुटुंबाकडून पती-पत्नीला शिवीगाळ करून बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. ही घटना पिंपरी सांडस (ता. हवेली) येथे शुक्रवारी (ता.२) सकाळी साडे अकरा वाजण्याच्या सुमारास घडली आहे. लोणीकंद पोलीस ठाण्यात चार जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सुनिल सुखदेव हरपळे (वय ३०), स्वप्नील सुखदेव हरपळे (वय ३५) किरण ज्ञानेश्वर हरपळे (वय-२७) व सुखदेव लक्ष्मण हरपले (वय-५७, सर्व रा. हरपळे वस्ती, पिंपरी सांडस ता. हवेली जि. पुणे) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी नवनाथ रामभाऊ हरपळे (वय-४२) यांनी लोणीकंद पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी नवनाथ हरपळे व आरोपी हे सावत्र चुलते, त्यांची मुले असल्याने एकमेकांचे नातेवाईक आहेत. त्यांना वडीलोपार्जीत शेतजमीन ही घराच्या शेजारीच आहे. फिर्यादी नवनाथ हरपळे यांची पत्नी सारीका यांनी सुनिल सुखदेव हरपळे यांच्याचेकडील कामगार महिलेकडून उसाचे वाडे विकत घेतले होते.

दरम्यान, आमचे वाडे का विकत घेता असे म्हणून सुनिल हरपाळे यांनी नवनाथ हरपळे यांना शिवीगाळ करण्यास सुरवात केली. आणि म्हणाले की, यारे बाहेर याला माज आला आहे . याचा आज माज जिरवून टाकू असे म्हणाल्यानंतर घरामधुन स्वप्नील हरपळे हा लाकडी दांडके घेऊन, किरण हरपळे हातात उस तोडणीचा कोयात घेऊन व सुखदेव हरपळे असे सगळे धावत फिर्यादी नवनाथ हरपळे यांच्या अंगावर आले. स्वप्नील हरपळे याने नवनाथ हरपळे यांना लाकडी दांडक्याने, सुनिल हरपळे याने शेतातील ऊसाने व सुखदेव हरपळे याने लाथा बुक्यांनी मारहाण तर किरण हरपळेने शिवीगाळ केली. त्यावेळी फिर्यादी नवनाथ हरपळे यांची पत्नी सारीका या भांडणे सोडविण्यासाठी प्रयत्न करू लागल्या तेव्हा किरण हरपळे याने त्यांना हाताने कानाखाली मारून शिवीगाळ केली.

याप्रकरणी नवनाथ हरपळे यांनी लोणीकंद पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार चारही आरोपींच्या विरोधात भारतीय न्याय संहिता कलम ११८ (१), ११५ (२), ३५१ (२), ३५२, १३१, ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास लोणीकंद पोलीस करत आहेत.

# सावित्रीबाईंनीच अज्ञानाच्या अंधारात पेटवली ज्ञानाची ज्योत : डॉ. स्नेहा बुरगुल

**लोणी काळभोर, ता. ३ :** अंगावर पडल्या शेण्या अन् दगड-गोटे, तरीही तिने पाय आपले कधीच नाही रोखले... अज्ञानाच्या अंधारात तिने पेटवली ज्ञानाची ज्योत, तीच ठरली स्त्री शिक्षणाची खरी भाग्यविधाती आणि साक्षात मूरत. आज आपण ज्या मुली शाळेत जात आहोत, मोठ्या पदांवर काम करत आहोत, हे सर्व सावित्रीबाईंच्या संघर्षाचे फळ आहे. सावित्री तू नसतीस तर, अज्ञानाचा अंधार असता, तुझ्यामुळेच आज स्त्रियांचा सन्मान आणि आधार उरला. असे प्रतिपादन डॉ. स्नेहा बुरगुल यांनी केले आहे.




लोणी काळभोर (ता. हवेली) येथील समाजभूषण गणपतराव काळभोर महाविद्यालयात सावित्रीबाई फुले यांची जयंती शनिवारी (ता.३) साजरी करण्यात आली. यावेळी प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ. अंबादास मंजुळकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वरील प्रतिपादन डॉ. स्नेहा बुरगुल यांनी केले.

पुढे बोलताना डॉ. स्नेहा बुरगुल म्हणाल्या की, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती संपूर्ण महाराष्ट्रात बालिका दिन म्हणून साजरा केला जातो. सावित्रीबाईंचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी सातारा जिल्ह्यातील नायगाव येथे झाला. वयाच्या अवघ्या ९ व्या वर्षी त्यांचा विवाह ज्योतिरावांसोबत झाला. लग्नानंतर ज्योतिरावांनी त्यांना अक्षर ओळख करून दिली आणि सावित्रीबाई देशातील पहिल्या महिला शिक्षिका बनल्या. केवळ शिक्षणच नाही, तर बालविवाह रोखणे, विधवा विवाहास प्रोत्साहन देणे आणि अनाथ मुलांसाठी आश्रम उघडणे अशी अनेक समाजसुधारणेची कामे त्यांनी केली. १८९७ मध्ये पुण्यात जेव्हा प्लेगची साथ आली, तेव्हा रुग्णांची सेवा करतानाच त्यांनी आपल्या प्राणाची आहुती दिली.

प्राचार्य डॉ. अंबादास मंजुळकर म्हणाले की, ज्या काळात स्त्रियांनी शिक्षण घेणे हे पाप मानले जात होते, त्या काळात अंगावर शेण-दगड सोसून त्यांनी ज्ञानाची गंगा घराघरात पोहोचवली. त्यावेळी मुलींना शिकवणे ही मोठी हिंमत होती. जेव्हा सावित्रीबाई शाळेत शिकवायला जायच्या, तेव्हा लोक त्यांच्यावर शेण फेकायचे, दगड मारायचे. पण सावित्रीबाई डगमगल्या नाहीत. त्यांनी शांतपणे तो अपमान सोसला आणि आपल्या झोळीत दुसरी साडी नेऊन आपले कार्य सुरूच ठेवले.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना माहित होते की, एक मुलगा शिकला तर एक व्यक्ती शिकते, पण एक मुलगी शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते. सावित्रीबाई फुले यांच्या कार्यामुळे चार्जर सरपंच या पदापासून ते देशाच्या राष्ट्रपती प्रधान मंत्री पदापर्यंत स्त्रिया विविध क्षेत्रात मग ते राजकीय सामाजिक धार्मिक शैक्षणिक सामाजिक सर्व क्षेत्रांमध्ये प्रगतीपथावर आहेत. याचे खरे श्रेय सावित्रीबाई फुलेंना जाते. असे यावेळी मार्गदर्शन करताना प्राचार्य मंजुळकर म्हणाले. दरम्यान, कार्यक्रमाचे आभार व सूत्रसंचालन प्रा. डॉ. शिवाजी गायकवाड यांनी केले.

# ओंकार साखर कारखान्याच्या राखेमुळे पिकांचे नुकसान; शेतकऱ्यांची यवत ग्रामपंचायतीकडे तक्रार

**राहुलकुमार अवचट**

यवत,ता.०४:दौंडतालुक्यातील यवत येथे नुकताच सुरू झालेल्या ओंकार साखर कारखान्याच्या बॉयलरमधून निघणाऱ्या राखेमुळे परिसरातील पिकांचे नुकसान होत असल्याची तक्रार दोरगेवाडी व लगतच्या परिसरातील शेतकऱ्यांनी यवत ग्रामपंचायतीकडे लेखी स्वरूपात केली आहे.

ओंकार साखर कारखान्याच्या बॉयलरमधून उडणारी राख फुलशेतीसह इतर पिकांवर पडत असून त्यामुळे पिके खराब होत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. दोरगेवाडी परिसरात मोठ्या प्रमाणात फुलशेती केली जाते. राखेचे बारीक कण पिकांवर साचल्याने उत्पादनावर परिणाम होत असल्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. या प्रकरणी त्वरित दखल घेऊन योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी ग्रामपंचायतीकडे करण्यात आली आहे.



> या ठिकाणी गेल्या अनेक वर्षांपासून अनुराज शुगर साखर कारखाना सुरू होता. त्यावेळी असलेलाच बॉयलर सध्या वापरण्यात येत आहे. बॉयलरमधून राख बाहेर जाणार नाही, याची पूर्ण काळजी घेतली जाते. तरीही काही प्रमाणात राखेचे बारीक कण बाहेर जात असतील तर याबाबत निश्चितच योग्य ती काळजी घेतली जाईल.
> - **राजेश थोरात,** व्यवस्थापक, ओंकार साखर कारखाना, यवत, ता. दौंड

> दोरगेवाडी येथील शेतकऱ्यांचा तक्रार अर्ज प्राप्त झाला असून या संदर्भात साखर कारखाना प्रशासनाशी पत्रव्यवहार करण्यात येणार असल्याची माहिती यांनी दिली.
> - **बालाजी सरवदे,** ग्रामपंचायत अधिकारी, यवत, ता. दौंड

# गर्भवती महिलेच्या मृत्यू प्रकरणी पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालय दोषी

**पुणे, ता. ०४ :** पुणे चॅरिटी कमिशनने लता मंगेशकर मेडिकल फाउंडेशन अंतर्गत चालवल्या जाणाऱ्या दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरला गंभीर आजारी असलेल्या गर्भवती महिला तनिषा भिसे यांना आवश्यक जीवनरक्षक वैद्यकीय उपचार आणि वेळेवर वाहतूक सुविधा न दिल्याबद्दल दोषी ठरवले आहे. या प्रकरणात रुग्णालय प्रशासनाने आपत्कालीन परिस्थितीत आवश्यक ती जबाबदारी पार पाडली नसल्याचे स्पष्ट झाले आहे.




संयुक्त धर्मादाय आयुक्त रजनी किरण क्षीरसागर यांनी या चौकशीचे निष्कर्ष नोंदवले आहेत. त्यांच्या अहवालानुसार, रुग्णालयातील संबंधित अधिकाऱ्यांनी आपत्कालीन वैद्यकीय सेवा देण्याच्या कर्तव्यात हलगर्जीपणा केला. तसेच रुग्णाची प्रकृती गंभीर असताना तिला तातडीने दुसऱ्या रुग्णालयात हलविण्यासाठी आवश्यक असलेली वाहतूक सुविधा देण्यातही अपयश आले. यामुळे रुग्णाच्या उपचारात विलंब झाल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले आहे.

पुणे धर्मादाय आयोगाच्या इतिहासात ही पहिलीच अशी चौकशी मानली जात आहे, ज्यामध्ये एका नामांकित आणि प्रतिष्ठित धर्मादाय रुग्णालयाविरुद्ध इतकी ठोस आणि कडक भूमिका घेण्यात आली आहे. रजनी किरण क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली ही चौकशी करण्यात आली. या चौकशीत उपधर्मादाय आयुक्त पुणे, रुग्णालय शाखेचे अधीक्षक दीपक खराडे तसेच निरीक्षक सचिन बकल आणि रविंद्र गवारे सहभागी होते.

चौकशी पूर्ण झाल्यानंतर पुणे धर्मादाय आयोगाचे निरीक्षक सचिन बकल यांनी दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल आणि त्याच्या ११ विश्वस्तांविरोधात न्यायालयात खटला दाखल केला आहे. या प्रकरणात पंडित हृदयनाथ मंगेशकर, भारती मंगेशकर, उषाताई मंगेशकर, आदिनाथ मंगेशकर, डॉ. धनंजय केळकर, डॉ. जितेंद्र क्षीरसागर, अधिवक्ता पी. एम. खिरे, सचिन व्यवहारे, आर. पी. जोशी आणि डॉ. प्रसाद राजहंस यांचा समावेश आहे.

दरम्यान, हा खटला पुणे येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांच्या न्यायालयात चालवण्यासाठी दाखल करण्यात आला आहे. कायदेशीर आणि सामाजिक वर्तुळात या निर्णयाकडे महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून पाहिले जात आहे. महाराष्ट्रातील धर्मादाय रुग्णालयांनी रुग्णसेवेतील जबाबदारी आणि नैतिक कर्तव्ये पाळावीत, यासाठी हा निर्णय एक महत्त्वाचा आदर्श ठरू शकतो, असे मत व्यक्त केले जात आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## केस पांढरे, काळवंडलेली त्वचा अन् सततचा राग? शरीरातील एका घटकाचा बिघाड

**पुणे, ता. ०४ :** पित्ताचा त्रास आजकालच्या धावपळीच्या जीवनात एक अतिशय सामान्य समस्या बनली आहे, मात्र याकडे केवळ किरकोळ आजार म्हणून दुर्लक्ष करणे भविष्यात आरोग्यासाठी महागात पडू शकते. चुकीचा आहार, अपुरी झोप आणि वाढता मानसिक ताण यामुळे शरीरातील पित्ताचे प्रमाण वाढते, ज्याचा परिणाम फक्त पचनसंस्थेपुरता मर्यादित राहत नाही.

पित्त दोष बिघडल्यास त्याचे गंभीर परिणाम तुमच्या केसांच्या आरोग्यापासून ते त्वचेच्या सौंदर्यापर्यंत आणि मानसिक शांततेपर्यंत सर्वत्र दिसून येतात. वेळीच काळजी न घेतल्यास याचे रूपांतर तीव्र मायग्रेन, अल्सर किंवा कायमस्वरूपी केसांच्या समस्यांमध्ये होऊ शकते, त्यामुळे शरीरातील पित्त संतुलित ठेवणे ही काळाची गरज बनली आहे.

केसांवर होणारे परिणाम : आयुर्वेदानुसार, शरीरातील अतिरिक्त उष्णता म्हणजेच 'पित्त' केसांच्या मुळांना कमकुवत करते.

अकाली केस पांढरे होणे : शरीरातील पित्त वाढल्यामुळे 'मेलॅनिन' (केसांना रंग देणारे द्रव्य) तयार होण्याची प्रक्रिया मंदावते. यामुळे वयाच्या -२५ व्या वर्षीच केस पांढरे होऊ लागतात.

केस गळणे आणि टक्कल पडणे : पित्तामुळे केसांच्या मुळांना मिळणारे पोषण कमी होते, ज्यामुळे केस मोठ्या प्रमाणात गळतात.

त्वचेच्या समस्या : रक्तात पित्त मिसळल्यास त्याचा थेट परिणाम त्वचेवर होतो.

पिंपल्स (मुरुमे) : पित्तामुळे चेहऱ्यावर लालसर आणि वेदनादायक मुरुमे येतात.

पित्ताचे चट्टे : अचानक अंगावर लाल रंगाचे चट्टे उमटणे आणि प्रचंड खाज सुटणे हे पित्त वाढल्याचे लक्षण आहे.

जळजळ आणि पुरळ : उन्हात गेल्यावर त्वचेची आग होणे किंवा बारीक पुरळ येणे.

भ्राजक पित्त : आयुर्वेदानुसार त्वचेचा रंग 'भ्राजक पित्त' नियंत्रित करते. जेव्हा शरीरातील उष्णता किंवा पित्त प्रमाणाबाहेर वाढते, तेव्हा हे पित्त बिघडते आणि त्वचेचा नैसर्गिक पोत आणि रंग खराब होतो. यामुळे चेहरा निस्तेज आणि काळवंडलेला दिसू लागतो.

मेलॅनिनचे प्रमाण वाढणे : शरीरातील अतिरिक्त उष्णतेमुळे त्वचेखालील 'मेलॅनिन' (रंगद्रव्य) तयार होण्याची प्रक्रिया वेगवान होते. विशेषतः चेहऱ्यावर, नाकावर किंवा गालावर काळे डाग पडू लागतात.

रक्तातील अशुद्धी : पित्त वाढले की रक्तामध्ये उष्णता वाढते. दूषित रक्तामुळे त्वचेला मिळणारे पोषण कमी होते, परिणामी त्वचा काळवंडते आणि त्यावर चकाकी राहत नाही.

सूर्याचा प्रभाव : ज्यांच्या शरीरात पित्त जास्त असते, त्यांची त्वचा सूर्याच्या किरणांना अतिशय संवेदनशील असते. अशा व्यक्ती थोडा वेळ जरी उन्हात गेल्या तरी त्यांची त्वचा इतरांच्या तुलनेत लवकर काळी पडते किंवा 'सनबर्न' होतो.

पचनसंस्थेचे आजार : पित्ताचा मुख्य संबंध पचनाशी असतो. पित्त बिघडल्यास खालील आजार होतात.

ॲसिडिटी आणि छातीत जळजळ : जेवणानंतर घशात किंवा छातीत आग होणे.

अल्सर : पोटात किंवा अन्ननलिकेत जखमा होण्याचा धोका वाढतो.

पित्ताशयातील खडे : पित्त साठून राहिल्याने त्याचे खड्यांमध्ये रूपांतर होऊ शकते.

मळमळ आणि उलट्या: सकाळी उठल्यावर तोंड कडू होणे आणि पित्ताची उलटी होणे.

यकृतावर ताण : पित्ताचा मुख्य संबंध यकृताशी असतो. यकृत नीट काम करत नसेल किंवा पित्त साठून राहत असेल, तर त्याचे प्रतिबिंब त्वचेवर 'पिगमेंटेशन' किंवा काळपटपणाच्या स्वरूपात उमटते.

मानसिक आणि इतर लक्षणे

चिडचिडेपणा आणि राग : पित्त वाढल्यास व्यक्तीला लवकर राग येतो आणि मानसिक अस्वस्थता जाणवते.

मायग्रेन : तीव्र डोकेदुखी, विशेषतः सूर्याच्या उष्णतेने डोके दुखणे.

डोळे लाल होणे : डोळ्यांत सतत जळजळ होणे किंवा डोळे लाल होणे.

पित्त वाढण्याची मुख्य कारणे.

अति तिखट, मसालेदार आणि तळलेले पदार्थ खाणे.

चहा, कॉफी आणि धूम्रपानाचे अतिसेवन.

अपुरी झोप आणि प्रचंड मानसिक ताण.


उन्हात जास्त वेळ काम करणे.

काय उपाय करावेत? : शरीरातील टॉक्सिन्स बाहेर काढण्यासाठी पाणी पिणे आवश्यक आहे. आहारात ताक, कोकम सरबत, आवळा, आणि गुलकंद यांचा समावेश करा.पडवळ, कारले किंवा कडूलिंबाचा रस पित्त कमी करून रक्त शुद्ध करतो, ज्यामुळे त्वचेचा रंग सुधारतो. बाहेर जाताना छत्री किंवा स्कार्फ वापरा, कारण पित्त प्रकृतीच्या लोकांसाठी ऊन घातक असते.

# राज्याच्या नव्या उद्योग धोरणात पुण्यासाठी 'डिफेन्स कॉरिडॉर'; संरक्षण उत्पादनाला मिळणार उभारी

**पुणे, ता. ४ :** राज्य सरकारच्या नव्या उद्योग, गुंतवणूक व सेवा धोरणात पुण्याला आर्थिक विकासाचे केंद्र बनविण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. या धोरणाअंतर्गत पुण्यातील संरक्षण उत्पादन क्षेत्राला गती देण्यासोबतच शहरासाठी संरक्षण कॉरिडॉर विकसित केला जाणार असून पुण्याला जागतिक क्षमता केंद्रांचे म्हणजेच जीसीसीचे हब बनविण्यात येणार आहे.

नवीन उद्योग धोरणात राज्यातील अवकाश आणि संरक्षण उत्पादन परिसंस्थेला चालना देण्यासाठी तीन संरक्षण कॉरिडॉर विकसित करण्याची घोषणा करण्यात आली आहे. त्यामध्ये पुणे, अहिल्यानगर आणि छत्रपती संभाजीनगर या भागांचा समावेश असलेला कॉरिडॉर महत्त्वाचा ठरणार आहे. याशिवाय नागपूर, वर्धा, अमरावती, सावनेर आणि नाशिक, धुळे असे आणखी दोन संरक्षण कॉरिडॉर विकसित केले जाणार आहेत. विमानतळ, बंदरे आणि महत्त्वाच्या पायाभूत सुविधांच्या जाळ्याजवळ हे कॉरिडॉर निश्चित करण्यात आल्याने अवकाश व संरक्षण उत्पादन क्षेत्राला मोठी चालना मिळणार आहे.




पुण्यातील निर्मिती क्षेत्राचा विस्तार आधीपासूनच मोठ्या प्रमाणात असून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील अनेक कंपन्या येथे कार्यरत आहेत. या कंपन्यांच्या उत्पादनांची चाचणी आणि गुणवत्ता प्रमाणन पुण्यातच केले जाणार आहे. यामुळे उत्पादनांच्या चाचणीसाठी लागणारा वेळ कमी होणार असून उद्योगांची कार्यक्षमता वाढण्यास मदत होणार आहे. यासाठी नॅशनल क्रेडिशन बोर्ड फॉर टेस्टिंग अँड कॅलिबरेशन लॅबोरेटरीज मान्यताप्राप्त चाचणी आणि गुणवत्ता प्रमाणन प्रयोगशाळा पुण्यात स्थापन केली जाणार आहे. राज्यातील प्रमुख निर्यात समूहांमध्ये अशा प्रयोगशाळा उभारण्यात येणार असून त्यासाठी पुण्याची निवड करण्यात आली आहे.

गेल्या काही वर्षांत पुण्यात बहुराष्ट्रीय कंपन्यांकडून जागतिक क्षमता केंद्रांची उभारणी होत आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर महाराष्ट्राला जीसीसीचे प्रमुख केंद्र बनविण्याचे सरकारचे उद्दिष्ट असून यासाठी मुंबई आणि पुणे यांना जीसीसी हब म्हणून प्रोत्साहन दिले जाणार आहे. वेतन अनुदान, करसवलती, संशोधन व विकासासाठी प्रोत्साहन, करकपात आणि भांडवली गुंतवणुकीस चालना देण्यासारख्या उपाययोजना करण्यात येणार आहेत. यामुळे आगामी काळात पुण्यातील जीसीसी परिसंस्था अधिक बळकट होणार आहे.

राज्यात नवोन्मेष आणि उद्योजकतेला चालना देण्यासाठी नवोपक्रम व नवोन्मेष हब स्थापन करण्याचा निर्णयही या धोरणात घेण्यात आला आहे. पुणे महानगर किंवा नवी मुंबई येथे सुमारे १०० एकर जागेवर हे केंद्र उभारण्यात येणार असून त्यातून कृत्रिम प्रज्ञा, ब्लॉकचेन, जैवतंत्रज्ञान, हरित ऊर्जा आणि स्मार्ट मॅन्युफॅक्चरिंगसारख्या क्षेत्रांतील स्टार्टअप्स, इनक्युबेटर, क्सिलरेटर आणि संशोधन केंद्रांना पाठबळ दिले जाणार आहे.

या नव्या उद्योग धोरणामुळे पुण्याच्या औद्योगिक परिसंस्थेला मोठी चालना मिळणार असल्याचे मत मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चरचे महासंचालक प्रशांत गिरबने यांनी व्यक्त केले आहे. संरक्षण कॉरिडॉर, एनएबीएल मान्यताप्राप्त प्रयोगशाळा आणि जीसीसी हबमुळे जागतिक पातळीवर संरक्षण, नवोन्मेष आणि जीसीसी केंद्र म्हणून पुण्याची ओळख अधिक भक्कम होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## तुफानातील दिवे नाटकाचा भव्य प्रकाशन सोहळा संपन्न

### ग्रंथ रसिक जिल्हास्तरीय मराठी साहित्य संमेलनात राज्य पुरस्कारप्राप्त नाटकाचे प्रकाशन

**कराड, ता. ४ :** वैजनाथ रेवाप्पा नाबदे लिखित व महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, महाराष्ट्र शासनाचा राज्य पुरस्कार प्राप्त तुफानातील दिवे या नाटकाचा प्रकाशन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.



श्री अनंतपाळ नवयुवक वाचनालय, शिरूर अनंतपाळ यांच्या वतीने आयोजित ग्रंथ रसिक जिल्हास्तरीय मराठी साहित्य संमेलन हे स्मृतीशेष शिवराज पाटील चाकूरकर साहित्य नगरी, शिरूर अनंतपाळ येथे दिनांक व डिसेंबर रोजी विविध साहित्यिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी पार पडले.

उद्घाटन सोहळ्यानंतर संमेलनाध्यक्ष व ज्येष्ठ विचारवंत व शिक्षक तज्ज्ञ प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली तुफानातील दिवे या नाटकाचा प्रकाशन सोहळा पार पडला. या प्रसंगी उद्घाटक म्हणून लातूरचे पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले हे उपस्थित होते. कार्यक्रमास स्वागताध्यक्ष एल. बी. आवाळे सर, माननीय मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रशासकीय अधिकारी मंजुषा कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी लातूरचे माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष संभाजीराव पाटील, शिक्षणतज्ज्ञ प्रभाकरराव कुलकर्णी, ज्येष्ठ साहित्यिक प्रा. एफ. एम. शहाजींदे, देविदास फुलारी, संजय गुडसुरकर, दगडू लोमटे, राजकुमार बिरादार सर यांच्यासह अनेक मान्यवर, साहित्यप्रेमी व रसिक श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, राज्य पुरस्कारप्राप्त तुफानातील दिवे या नाटकाच्या प्रकाशनाने संमेलनात विशेष साहित्यिक उत्साह निर्माण झाला. समाजातील संघर्ष, श्रमिकांचे जीवन व मानवी मूल्यांचे प्रभावी दर्शन घडविणाऱ्या या नाटकाचे मान्यवरांनी विशेष कौतुक केले. हा प्रकाशन सोहळा साहित्यप्रेमींसाठी प्रेरणादायी ठरला असून, जिल्ह्यातील साहित्य चळवळीला नवी ऊर्जा देणारा ठरला.

## स्वाती देवकर यांना पीएच. डी. पदवी

**कराड, ता. ४ :** डॉ. स्वाती रघुनाथ देवकर यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथून नॅनोफायबरचा विकास आणि वैशिष्ट्यीकरण या अत्याधुनिक व संशोधनात्मक विषयावर यशस्वीपणे पीएच.डी. पदवी संपादन केली आहे.



नॅनोतंत्रज्ञान व औषध वितरण प्रणाली या महत्त्वाच्या संशोधन क्षेत्रात त्यांनी केलेले संशोधन आरोग्य व औषधशास्त्र क्षेत्रासाठी अत्यंत उपयुक्त ठरणारे आहे. नॅनोफायबर्सच्या साहाय्याने औषधांचे अधिक प्रभावी, सुरक्षित व नियंत्रित वितरण कसे करता येईल, यावर त्यांच्या संशोधनात विशेष भर देण्यात आला आहे.

डॉ. देवकर यांच्या संशोधन कार्याची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर दखल घेण्यात आली असून त्यांच्या नावावर २ पेटंट्स, १ कॉपीराइट तसेच ३ आंतरराष्ट्रीय दर्जाचे संशोधन लेख प्रकाशित झाले आहेत. हे यश त्यांच्या सातत्यपूर्ण अभ्यास, कठोर परिश्रम व वैज्ञानिक दृष्टिकोनाचे द्योतक आहे. देवकर यांना डॉ. मनोज तारे यांनी मार्गदर्शन केले. दरम्यान, या उल्लेखनीय यशाबद्दल शैक्षणिक, संशोधन तसेच सामाजिक क्षेत्रातून त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत असून त्यांच्या पुढील संशोधन व शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उमेदवाराकडून मानसिक छळ

### हडपसर येथील उमेदवाराने केली आत्महत्या

**हडपसर, ता. ०४ :** पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत हडपसर परिसरातून एक अतिशय धक्कादायक बातमी समोर आली आहे. प्रभाग क्रमांक ४१ मधील अपक्ष उमेदवार सादिक उर्फ बाबू कपूर यांनी स्वतःच्या कार्यालयात गळफास घेऊन आत्महत्या केल्याने खळबळ उडाली आहे. सादिक यांचे वय ५६ वर्षे असून मतदानाच्या काही दिवस आधीच त्यांनी उचललेल्या या टोकाच्या पाऊलामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. पोलिसांनी या प्रकरणी तपास सुरू केला असून घटनास्थळावरून काही महत्त्वपूर्ण धागेदोरे हाती लागले आहेत.

सादिक यांनी मृत्यूपूर्वी ३० पानांची एक सविस्तर सुसाईड नोट लिहून ठेवली होती. त्यांनी स्वतःच्या हातावर काही लोकांची नावे लिहिल्याचे तपासात उघड झाले आहे. या सुसाईड नोटमध्ये सादिक यांनी आपल्या मृत्यूसाठी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार फारुख शेख यांना जबाबदार धरल्याचा गंभीर आरोप केला आहे. फारुख शेख यांच्या त्रासाला कंटाळून मी हे टोकाचे पाऊल उचलत आहे, असे सादिक यांनी लिहिले आहे या पत्रात इतरही काही प्रभावशाली व्यक्तींची नावे असल्याची माहिती समोर येत असून पोलिसांनी ती सर्व कागदपत्रे ताब्यात घेतली आहेत.



पोलिसांनी या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन गुन्हा दाखल केला असून सुसाईड नोटमधील मजकुराची चौकशी सुरू केली आहे. निवडणुकीच्या काळात एका उमेदवाराने प्रतिस्पर्धी उमेदवाराचे नाव लिहून आत्महत्या केल्यामुळे या प्रकरणाला आता मोठे राजकीय वळण प्राप्त झाले असून पोलिस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

## महादेव उर्फ आप्पा शिंदे एम.पी. डी.ए. कायद्यान्वये स्थानबद्ध

**आदित्य बोराटे**

इंदापूर, ता. ०४ : पळसदेव परिसरात वास्तव्यास असलेला सराईत व धोकादायक इसम महादेव ऊर्फ आप्पा अशोक शिंदे यास एम.पी.डी.ए. कायद्यान्वये स्थानबद्ध करण्यात आले आहे. इंदापूर पोलिसांनी ही कारवाई करत त्यास मध्यवर्ती कारागृह, नागपूर येथे दाखल केले आहे.

महादेव ऊर्फ आप्पा शिंदे याच्यावर यापूर्वी खुनाचा प्रयत्न, खून, शिवीगाळ, दमदाटी, खंडणीसाठी धमकी देणे, सरकारी मालमत्तेचे नुकसान करणे तसेच अवैध हत्यारांचा वापर करून जबरदस्ती करणे अशा स्वरूपाचे एकूण चार गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्याच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीमुळे परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल यांच्या मार्गदर्शनाखाली इंदापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विलास नाळे व त्यांच्या अधिनस्त पोलीस अधिकारी व अंमलदारांच्या विविध पथकांनी ही कारवाई यशस्वीपणे पार पाडली. आरोपीचा शोध घेऊन त्यास ताब्यात घेण्यात आले.




दरम्यान, स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका तसेच आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका शांततेत व भयमुक्त वातावरणात पार पडाव्यात, या उद्देशाने ही प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. या कारवाईमुळे पळसदेव व परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून पोलिसांच्या ठोस भूमिकेचे स्वागत करण्यात येत आहे.

## देवघर गावात आक्रमक मादी माकडाला वनविभागाकडून सुरक्षितरीत्या पकडले

**भोर, ता. ०४ :** देवघर (ता. भोर) येथे गेल्या काही दिवसांपासून लाल तोंडाची आक्रमक मादी माकड लहान मुले व महिलांवर अंगावर धावून येत असल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. शाळेत जाणारी लहान मुले तसेच घराबाहेर कामानिमित्त जाणाऱ्या महिलांना या माकडामुळे मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.



या घटनेची माहिती ग्रामस्थांनी वनरक्षक समीर जाधव यांना दिल्यानंतर भोर वनविभागाने परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने पुणे येथील रेस्क्यू टीमला पाचारण केले. वनविभागाच्या कर्मचाऱ्यांच्या समन्वयाने रेस्क्यू टीमने योग्य नियोजन करून कोणतीही इजा न होता संबंधित मादी माकडाला सुरक्षितरीत्या जेरबंद केले.

या रेस्क्यू मोहिमेत पुणे जिल्हा वन्यप्राणी व सर्परक्षक असोसिएशनचे भोर तालुका अध्यक्ष तबरेज खान यांनी प्रत्यक्ष सहभागी होत महत्त्वपूर्ण सहकार्य केले. त्यांच्या अनुभवामुळे व समन्वयामुळे ही रेस्क्यू प्रक्रिया अधिक सुरक्षित आणि यशस्वीरीत्या पार पडली. माकड पकडल्यानंतर वनविभागाच्या वतीने ग्रामस्थांना महत्त्वाचे मार्गदर्शन करण्यात आले. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कोणत्याही वन्यप्राण्यांना अन्न देऊ नये, त्यांच्या जवळ जाणे किंवा छेडछाड करणे टाळावे तसेच सुरक्षित अंतर राखावे, असे आवाहन करण्यात आले. दरम्यान, वन्यप्राण्यांना अन्न दिल्यास ते मानवी वस्तीकडे आकर्षित होऊन आक्रमक होण्याची शक्यता वाढते, असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. वनविभागाच्या तातडीच्या कारवाईमुळे मोठा अनर्थ टळला असून देवघर ग्रामस्थांनी वनविभाग, रेस्क्यू टीम तसेच सहकार्य करणाऱ्या सर्व व्यक्तींचे आभार मानले आहेत.

# जय जिनेंद्र म्हणत अजित पवारांनी मुरलीधर मोहोळांना पुन्हा डिवचलं

### जमीन घोटाळ्यावरून पुण्यात वादाचा भडका

**पुणे, ता. ०४ :** पुण्यात गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींना उमेदवारी देण्याच्या मुद्द्यावरून राजकीय वातावरण चांगलेच तापले असून भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्यात थेट आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. भाजपने या मुद्द्यावरून राष्ट्रवादीवर जोरदार टीका केल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट शब्दांत आपली भूमिका मांडली आहे. अजित पवार म्हणाले की, एखादी व्यक्ती गुन्हेगार आहे म्हणून तिच्या पत्नीचा किंवा कुटुंबाचा काय दोष आहे, हा मूलभूत प्रश्न आहे. मित्र पक्षांना कोणाला उमेदवारी द्यायची, हा त्यांचा अधिकार असून आपण स्वतः गुन्हेगारांना उमेदवारी दिलेली नाही. मित्र पक्षांनी घड्याळ चिन्ह देण्याची विनंती केली होती आणि अनेक निवडणुकांमध्ये असे होत असते, असेही त्यांनी स्पष्ट केले.



मुंढवा जमीन घोटाळा प्रकरणावर बोलताना अजित पवार यांनी सूचक टिप्पणी करत बहुतेकांना आता कळले आहे की तो व्यवहार होऊच शकत नव्हता, असे म्हटले. या प्रकरणातील चौकशीचा संदर्भ देत जय जिनेन्द्र प्रकरणात काय झाले, हे सर्वांनाच माहिती आहे, असे म्हणत त्यांनी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांना अप्रत्यक्ष टोला लगावला.

दरम्यान, पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील राजकीय वातावरण अधिकच तापले असल्याचे चित्र आहे. भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आमनेसामने आल्याने प्रचारातही धार वाढताना दिसत आहे. विविध मुद्द्यांवरून नेते एकमेकांवर टीका करत असून राजकीय संघर्ष तीव्र होत आहे. विकासकामांबाबत बोलताना अजित पवार यांनी कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांना महत्त्वाच्या सूचना दिल्या. विकासकामे करताना केवळ येरे माझ्या मागल्या अशा पद्धतीने काम करू नका, तर दर्जेदार आणि पारदर्शक कामांवर भर द्या. चुकीच्या गोष्टींना थारा देऊ नका. अनेकदा हावशे, नवशे, गवशे आजूबाजूला जमतील आणि खरे काम करणारे बाजूला पडतील, याची जाणीव ठेवण्याचा सल्ला त्यांनी दिला. विरोधकांचीही कामे करा, मात्र आधी आपल्या नगरसेवकांच्या कामांना प्राधान्य द्या, असेही ते म्हणाले. मुरलीधर मोहोळ यांनी केलेल्या टीकेवर प्रतिक्रिया देताना अजित पवार म्हणाले की, प्रत्येकाला बोलण्याचा अधिकार आहे. मात्र एक व्यक्ती घायावळ असताना ती परदेशात पळून कशी गेली, असा सवाल उपस्थित करत त्यांनी मोहोळांवर पुन्हा टोला लगावला. निवडणुकीनंतर पुन्हा एकत्र येणार का, या प्रश्नावर बोलताना असा प्रश्नच उद्भवणार नाही. आम्ही महापौर करण्यासाठीच ही लढाई लढत आहोत आणि आमचाच महापौर होणार, असा ठाम दावा अजित पवार यांनी केला.